ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XI, Issue- III May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

# कोविड १९ मध्ये ताण व्यवस्थापनात महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका

*** प्रा. फरिदा सय्यद**

*ग्रंथपाल, श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालय, ईमेल आय डी: *library@siddhivinayakcollege.org*

**शोधनिबंध घोषवारा :**

*सदर शोधनिबंधात संशोधकाने कोविड १९ मध्ये विद्यार्थ्यावर येणारा ताण घालविण्याच्या दृष्टीने ग्रंथालयाची भूमिका याचा अभ्यास केला आहे. कोविड १९ या आजारात महाविद्यालये शाळा बंद होत्याच त्यशिवाय दैनंदिन व्यवहार हि बऱ्याच प्रमाणात ठप्प झालेले होते. घरामध्ये शेजारी आजूबाजूला कोविड १९ चे पेशंट वाढत असल्यामुळे घरात बसून राहणे, ऑनलाइन पद्धतीने महाविद्यालयाचे तास, परीक्षा देणे यामुळे विद्यार्थ्यावर ताण आला होता. हा ताण घालविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिकेचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे. शोधनिबंध लिहिताना संशोधकाने व्यष्टी अध्ययन Case Study आणि निरीक्षण पद्धती व वैयक्तिक अनुभवाचा अभ्यास करून लिहिला आहे. या शोधनिबंधात ताण घालविण्यासाठी वाचन सवयी विद्यार्थ्याला ताण व्यवस्थापनासाठी उपयोगी पडते असा निष्कर्ष काढता येईल.*

**बीज संज्ञा:** *कोविड-१९, ग्रंथालय, ताण-तणाव, मानसिक विकास*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

ताण या संकल्पनेचा २० व्या शतकात शोध लागला. काही लोकांना आनंदाचा पण ताण येतो . तर काहींना दुःखाचा ताण येतो. ताण हि आजच्या युगात रोजची जीवनशैली झाली आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांपासून तर वृद्ध माणसांपर्यंत सर्वांना ताण येत असतो ताण सकारात्मक आणि नकारात्मक असतात. प्रत्येकाचा दृष्टीकोन ठरवतो, ताण चांगला आहे कि वाईट आहे , यासाठी ताण व्यवस्थापनासाठी गरज असते . मानसिक ताणातून बाहेर पडून आनंदी जीवन जगणे, त्यावर उपाय शोधणे म्हणजे ताण व्यवस्थापन.

ताण हा मृत्यू, अपघात , आर्थिक, भावनिक संकट, प्रेमभंग, अपेक्षाभंग, आजारपण, स्पर्धापरीक्षा, अशा प्रकारचा असू शकतो. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वूहानमध्ये कोविड १९ या आजाराची पहिली ओळख झाली. आणि त्यानंतर या आजाराचा जागतिक स्तरावर प्रसार झाला, व त्याने महामारीचे रौद्र रूप घेतले. या आजारात ताप, खोकला, दम लागणे या लक्षणांचा समावेश होता. या महामारीत जगातील बरेच लोक मृत्युमुखी पडले.

मार्च २०२० मध्ये भारतात आल्यावर राज्यात शाळा महाविद्यालय आणि इतर बऱ्याच गोष्टी बंद झाल्या. लोक बाहेर पडत नव्हते . या आजाराचा परिणाम शारीरिक व मानसिक दोन्ही गोष्टींवर होऊ लागला. शैक्षणिक संस्था बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने होऊ लागले. त्यामुळे परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होऊ लागल्या. या सर्वांचा ताण विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणात आला. या काळात ताण व्यवस्थापनासाठी ग्रंथालयाने काही पावले उचलणे गरजेचे होते. वाचनाने ताण कमी होतो त्यामुळे ताण व्यवस्थापनात वाचन महत्वाचे आहे. वाचनाचे साहित्य वाचकापर्यंत पोहोचविणे हे ग्रंथालयाचे प्रमुख कार्य असल्यामुळे संशोधकाने कोविड १९ च्या काळात ताण व्यवस्थापनात ग्रंथालयाच्या भूमिकेचा अभ्यास केला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

शोधनिबंधाचा अभ्यास करताना कोविड १९ च्या काळात शैक्षणिक संस्था बंद असताना महाविद्यालयीन ग्रंथालयाने विद्यार्थ्यांपर्यंत ताण व्यवस्थापन म्हणजेच ताण कमी करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या पद्धतीने माहिती पोहोचविणे गरजेचे आहे. तसेच वाचनाने ताण कमी होतो त्यादृष्टीने कोणते साहित्य पुरविले पाहिजे. वाचन साहित्य ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देणे. वाचनाचे महत्व काय आहे किंवा वाचनाचे फायदे तोटे याचाही अभ्यास केला आहे.

**अध्ययनाचे स्वरूप :**

शोधनिबंध लिहिताना माहिती मिळविण्याच्या स्त्रोताला महत्व आहे. माहितीचे स्त्रोत तीन प्रकारचे असतात, यामध्ये प्राथमिक, द्वितीय व तृतीय माहिती स्त्रोत असतात. सदर शोधनिबंध लिहित असताना संशोधकाने प्राथमिक स्त्रोताचा उपयोग केला आहे. संशोधकाने माहितीसाठी व्यष्टी अध्ययन पद्धती व निरीक्षण या दोन संशोधन पद्धतीचा अभ्यास करून तसेच स्वतःच्या व इतर ग्रंथपालांच्या अनुभवावरून शोधनिबंध सादर केला आहे. शोधनिबंध लिहित असताना वैयक्तिक अनुभव व प्रत्यक्षातील भूमिका या गोष्टींचाही सहभाग आहे

**वाचनाचे महत्व :**

ताण व्यवस्थापनात ग्रंथालयाची भूमिका स्पष्ट करत असताना प्रथम वाचनाचे महत्व लक्षात घेणे गरजेचे आहे. ‘ वाचाल तर वाचाल ‘ असे म्हणतात ते अगदी खरय. वाचन सवय हि अति महत्वाची आवड आहे. वाचन सवय वाचकाचा आत्मविश्वास वाढविते. ताण कमी करते आणि माणसाला नेहमी आनंदी ठेवते.

Mary McCleod Buthure says –

‘’ The whole world opened up to me when I learned to Read. ‘’

**वाचनाचे फायदे :**

- मानसिक विकास होतो.
- बुद्धीला चालना मिळते.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XI, Issue– III May – June, 2022
OPEN ACCESS Original Research Article

- जीवनात जगण्याचा मार्ग मिळतो.
- शब्द संपदा वाढते.
- कल्पकता वाढते.
- भाषेचे ज्ञान वाढते.
- संभाषणकला वाढते.
- वेळेचा योग्य उपयोग होतो.

**वाचनाच्या महत्त्वामुळे कोविड १९मध्ये ताण घालविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका:**

१. वाचनसाहित्य ऑनलाइन पद्धतीने पुरविणे :- ग्रंथालय हा वाचक आणि ग्रंथ संपदायातील महत्वाचादुवा आहे. वाचन साहित्य ऑनलाइन पद्धतीने पुरविताना उदा: वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके, इ.माहिती देताना ऑनलाइन संकेतस्थळांची माहिती देणे.

२. ऑनलाइन पद्धतीने वाचनाचे महत्व यावर ग्रंथपालाने व्याख्यान देणे किंवा आयोजित करणे.

३. ग्रंथालयात थोर विचारवंत, साहित्यिक, थोर सामाजिक व्यक्ती , शास्त्रज्ञ इ. वरील माहिती संकलित करून, विद्यार्थ्यांचे ग्रुप करून त्यावर मोबाईल फोनद्वारे पाठविणे.

४. ग्रंथालयाने विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या विषयांवर निबंध स्पर्धा , पुस्तकपरीक्षण स्पर्धा , कविता वाचन स्पर्धा आयोजित करणे.

५. निरनिराळ्या विषयांवर व्याख्यान आयोजित करून ताण व्यवस्थापन, कोविड १९ काळातील आहार व इतर विषयांवर प्रश्नमंजुषा तयारकरून विद्यार्थ्यांना पाठविणे.

अशा प्रकारचे बुद्धीला चालना देणारे व विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवणारे कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मेंदूवरील ताण कमी करण्यास प्रभावी ठरू शकते.

६. ऑनलाइन माध्यमातून अभ्यासक्रमाशी निगडीत असलेली नाटके, सिनेमे दाखविणे.

७. ग्रंथालयात महत्वाच्या विषयांवरील कात्रणांचा संग्रह करून ठेवणे म्हणजे नियमित महाविद्यालय सुरु झाल्यावर त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकतो .

८ .थोर व्यक्तींच्या जयंतती ऑनलाइन पद्धतीने साजरे करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

**निष्कर्ष :**

ताण व्यवस्थापनात महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या भूमिकेचा विचार करताना वरील प्रकारचे कार्यक्रम आयोजित केल्यामुळे किंवा विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने वाचन साहित्य पुरविल्यामुळे त्यांना त्यांच्या रोजच्या जीवनातील ताण कमी होऊन

ISSN–2278-5655

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

*Volume–XI, Issue– III* *May – June, 2022*

OPEN ACCESS Original Research Article

शिवाय वाचनाची आवड निर्माण होऊन तसेच आनंदाने जीवन जगण्यास मदत होऊ शकेल.

कोविड १९ सारखे कोणतेही संकट आले किंवा वैयक्तिक कारणाने विद्यार्थ्यांवर ताण येत असेल तर ग्रंथालयाने अशा प्रकारच्या भूमिका बजावणे गरजेचे नाही तर महत्वाचे आहे. आपल्याला आनंद झाला किंवा आपला ताण कमी झाला तर साहजिकच सुकर आणि आनंदी जीवन जगता येते व भावी आयुष्यात आपण ठरविलेले जीवनाचे उद्दिष्ट साध्य करता येते. म्हणून ग्रंथालयाची भूमिका ताण व्यवस्थापनात खूप महत्वाची आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. शेवाळे, व्ही एम.- महाविद्यालय कार्यालयीन कामकाज , डायमंड प्रकाशन; पुणे, २००५

२. सुभेदार, आय.एस.- महाविद्यालयीन प्रशासनातील परिवर्तनाच्या दिशा , सी.के.पब्लिशर्स; कोल्हापूर,२००२

३. महामने, लक्ष्मण - महाविद्यालय : समग्र गुणवत्ता व्यवस्थापन, विद्या प्रीतम प्रकाशन ; पुणे, २०१०

४. आगलावे, प्रदीप - संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे , विद्या प्रकाशन; नागपूर, २०००.

५. मराठी विश्वकोश खंड ७,१३ ; महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ; मुंबई, १९८७.

६. कंठी, अश्विनी अनु.- ताण, मनोविकास प्रकाशन पुणे, २००८

७. Pradhan, S. and Jena, P. – Stress Management, SSDN Publishers; New Delhi, 2013

८. सरदेसाई, ह.वि. आणि भावे, सरिता – मानसिकताण आणि वार्ध्यक्य, श्री विद्या प्रकाशन; पुणे, २००४

***Cite This Article:***

*** प्रा. फरिदा सय्यद ,** *(2022).* कोविड १९ मध्ये ताण व्यवस्थापनात महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (III) May – June,*** *250-253.*